॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

फेब्रुवारी २०२२

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

# शिवजयंती

## १९ फेब्रुवारी

छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार,  
त्रिवार जयजयकार ।।धृ।।  
हिंदवी स्वराज्याचे तोरण,  
बांधुनिया गाजवी समरांगण  
आई भवानी प्रसन्न होऊन, देई साक्षात्कार ।।  
स्फुर्तीकेंद्र हे भारतीयांचे,  
दैवत आमुच्या नवतरूणांचे  
आद्य प्रवर्तक संघटनेचे, सदा विजयी होणार ।।  
पुजा बांधू सामर्थ्याची,  
इच्छापूर्ती श्री शिवबाची  
उठता उर्मी समर्पणाची, काय उणे पडणार ।।



# शाखा विभाग

◆ **धर्मवीर शंभूराजे शाखा** – रविवार दि. ३० जानेवारीला तळजाई टेकडीवर शाखा घेण्यात आली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात वर्धक उत्साहाने आणि आनंदाने शाखेत रमले. त्याच दिवशी संध्याकाळी शाखेचा समर्पण दिन साजरा झाला. दि. २९ जानेवारीला १० वीतील वर्धकांच्या पालकांची सभा झाली. पालकांना मुलांचा अभ्यास चांगला व्हावा यासाठी केलेले नियोजन सांगितले व त्यांनी या नियोजनाला संमती दिली. ही मुले पूर्ण महिनाभर लोकशाहीर आण्णाभाऊ अभ्यासिकेत नियोजनपूर्वक अभ्यास करणार आहेत.

◆ **स्वामी श्रद्धानंद शाखा** – २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त शाखेत वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले आहे. मुलांनी आणि युवकांनी एकत्र येऊन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतरच्या कृतीसत्रात भारताचे कागदी नकाशे देऊन मुलांना भारताचे भौगोलिक स्वरूप, सीमा, राज्ये, केंद्रशासित प्रदेश यांची नावे लिहून देण्यात आली. शाखेत प्रथमेश पोकळे दादाने प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगून संविधानातील काही महत्त्वाचे कायदे, आपले हक्क आणि भारतीय म्हणून असलेले आपले कर्तव्य याविषयी माहिती दिली.



◆ **समर्थ रामकृष्ण शाखा** – २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिन – वर्धिनीत ७३ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुण्या मा. मृणालिनीताई चितळे यांनी स्त्री पुरुष तुलना, शिक्षणाचा हक्क, नियम पाळणे यावर सर्वांशी संवाद साधला. सदर कार्यक्रमात रामकृष्ण शाखेचा शाखेत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेची बक्षिसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना देण्यात आली.

◆ **राजर्षी शाहू महाराज शाखा** – कोणतीही गोष्ट करताना नियोजन असणे खूप महत्त्वाचे असते. अभ्यासाचा विचार करून शाखेने वेगळ्या पद्धतीचे नियोजन करून मुलांना दिले. बऱ्याच वेळा करून दिलेले नियोजन फक्त दोन तीन दिवसांपुरते टिकते. त्यामुळे वेगळे आणि टिकेल असे हे नियोजन मुलांना दिले आहे. घरात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावायला सांगितले आहे जेणेकरून वर्धकाच्या लक्षात राहील की आपण कोणत्या वेळेत काय करायचे आहे आणि त्याच्या घरच्यांना सुद्धा माहिती असेल.

# क्रीडा दिन



कोरोनामुळे दोन वर्षांनंतर झालेल्या क्रीडादिनात युवकांनी, वर्धकांनी मैदानावर जोशात, मैत्रीपूर्ण चढाओढीत एकमेकांना पाठिंबा देत, कौतुक करत सर्वजण खेळत होते. याची तयारी म्हणून भांडार, पूरक आहार, बक्षीस वितरण, तांत्रिक, सजावट, वातावरण निर्मिती, वैद्यकीय, आर्थिक, उद्‌घाटन व समारोप कार्यक्रम अशा व्यवस्थांची जबाबदारी सर्व शाखेतल्या युवक कार्यकर्त्यांनी घेतली.

वैयक्तिक स्पर्धा चंद्रशेखर आगाशे कॉलेजच्या मैदानावर दि. २ जानेवारीला सकाळी झाल्या. वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. यातील बक्षीसप्राप्त वर्धक –

**१) १०० मी. धावणे :**

लहान गट (५ वी, ६ वी) – तुषार पालकर, आर्यन रेणुसे, शुभम उतेकर

मध्यम गट (७ वी, ८ वी) – साजिद खान, तप्पी सोनार, समर्थ शिळीमकर

मोठा गट (९ वी, १० वी) – आदित्य सुळे, संचित पवार, विपुल आंबेकर

युवक गट (११ वी, १२ वी) – गणेश मन्ने, पियुश उभे, रोहन तांदळे

युवक गट (F.Y. ते T.Y.) – सुरज कनाल, जयेश वाढोनकर, आदित्य घोरपडे,

युवक गट (व्यावसायिक) – अनिकेत कावणकर, सोहम महाजन, शेखर चव्हाण

**२) १६०० मी. धावणे :**

लहान गट (५ वी, ६ वी) – ओम खाडे, निखिल देडे, मनीष शेलार

मध्यम गट (७ वी, ८ वी) – शुभम गुढूळकर, करण राठोड, यश पवार

मोठा गट (९ वी, १० वी) – सार्थक फाले, रोहन नकटे, रोहन मरगळे

युवक गट (११ वी, १२ वी) – श्रेयश खंडाळे, शिरज गुरसाळे, तानाजी जन्नड

युवक गट (F.Y. ते T.Y.) – चंदन महतो, स्वराज बने, ओंकार जाधव

युवक गट (व्यावसायिक) - सागर चव्हाण, आशिष कदम, मंदार सोनावणे

**३) लांब उडी :**

लहान गट (५ वी, ६ वी) - वेदांत पवार, गणेश नंदगीरे, रोहन सूर्यवंशी

मध्यम गट (७ वी, ८ वी) - साजिद खान, करण सरोज, तप्पी सोनार

मोठा गट (९ वी, १० वी) - केतन रायरीकर, अक्षय औजी, वेदांत सपकाळ

**४) रिले (सांघिक स्पर्धा) :**

लहान गट (५ वी, ६ वी) - शिवानंद शाखा, ब्रह्मानंद शाखा, सुबोधानंद शाखा

मध्यम गट (७ वी, ८ वी) - श्रद्धानंद शाखा, सुबोधानंद शाखा, दयानंद शाखा

मोठा गट (९ वी, १० वी) - शाहू शाखा, शंभूराजे शाखा, ब्रह्मानंद शाखा

युवक गट (११ वी, १२ वी) - रामकृष्ण शाखा, शिवानंद शाखा, श्रद्धानंद शाखा

युवक गट (F.Y. ते T.Y.) - सुबोधानंद शाखा, नरवीर तानाजी शाखा, दयानंद शाखा

**५) समता (सांघिक स्पर्धा) :**

(१) दयानंद शाखा (२) ब्रह्मानंद शाखा

सांघिक स्पर्धा दि. ८, ९ जानेवारीला एपीजे अब्दुल कलाम ई-लर्निंग स्कूल आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशालेच्या मैदानावर झाल्या. स्पर्धांचे उद्घाटन राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सर खेळाडू श्री. अनिकेत कांबळे यांनी केले तर बक्षीस वितरण सामाजिक कार्यकर्ते श्री. स्वप्निल दुधाने यांच्या हस्ते झाले. त्यातील विजेते -

१) लंगडी - लहान गट (५ वी ते ७ वी) - राजर्षी शाहू शाखा (विजेता), ब्रह्मानंद शाखा (उपविजेता)

२) कबड्डी - मोठा गट (८ वी ते १० वी) - समर्थ रामकृष्ण शाखा (विजेता), धर्मवीर शंभूराजे शाखा (उपविजेता)

३) कबड्डी - युवक गट (११ वी ते १२ वी) - स्वामी ब्रह्मानंद शाखा (विजेता), योगानंद शाखा (उपविजेता)

४) फुटबॉल - युवक गट (F.Y. ते T.Y.) - स्वामी ब्रह्मानंद + शाहू शाखा (विजेता), सुबोधानंद शाखा (उपविजेता)

५) व्हॉलीबॉल - युवक गट (व्यावसायिक) - स्वामी श्रद्धानंद शाखा (विजेता), दयानंद शाखा (उपविजेता)





## युवा विभाग



◆ **हिवाळी सहल,** दि. ६ व ७ फेब्रुवारी २०२२, ठिकाण - राजमाची (लोणावळा), एकूण - ४८ युवक.

सहल प्रमुख - वैभव दळवी, सहाय्यक - प्रथमेश राजगुडे, किरण ननावरे.

वर्धिनीमध्ये ३ ते ५ या वेळात एकत्रीकरण झाले. सर्वांचे परिचय आणि शिववंदना झाल्यावर सहलीसाठी प्रस्थान केले. प्रवासाचा आनंद म्हणजे पद्यांची अंताक्षरी. डफाच्या तालावरील अगदी इतरांना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या उत्तम शैलीत पद्य म्हणत प्रवास झाला. जेवण झाल्यानंतर निवासाच्या ठिकाणी 'माझं करियर काय व कशासाठी आणि त्याच्या दिशा काय' यावर श्री. निलेश धायरकर यांनी संवाद साधला गेला. पसायदान घेऊन समारोप झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना, प्रबोधन झाल्यांतर रोहित धायरकर दादाने छत्रपती शिवराय आणि बाजीप्रभू देशपांडे यांचा इतिहास सांगितला. चेतन कुसाळकर दादाने आपल्या शैक्षणिक शाखेनुसार (विज्ञान, वाणिज्य, कला) गट





केले. प्रत्येक गटाला एक - एक विषय दिला. विज्ञान - समाजातील असे प्रश्न त्याचे उत्तर म्हणजे शाखा, वाणिज्य - पद्य - 'हेची येळ देवा...', कला - किल्ल्याच्या परिसरातील प्रत्येक गोष्ट/वस्तू आपल्याला काय शिकवते. याप्रमाणे प्रत्येक गटाने गडावर पोहोचल्यावर सादरीकरण केले. गटानुसार चर्चा करत, जोरदार घोषणा देत, गडाचा इतिहास जाणून घेत.. (निलेश सर सांगत होते) पद्य म्हणत, फोटो काढत, किल्ल्यावर पोहोचलो.

नंतर अफजलखानाचा वध यावर रचलेला पोवाडा गायला. 'छत्रपती शिवरायांच्या इतिहासातून आपण काय शिकलं पाहिजे', यावर आपल्या दैनंदिन जीवनात साजेशा उदाहरणावरून अभय पोते याने प्रभावी शैलीत विचार मांडले. पोलीस पाटील श्री. सुभाष वरे आणि त्यांच्या पत्नी सुनीताताई यांनी (नॅशनल खेळाडू कबड्डीपटू) मुलांशी संवाद साधला. त्यांच्या हस्ते प्रत्येक गटाच्या सादरीकरणास बक्षीस दिले.

◆ **व्याख्यान** - एमबीए ला प्रवेश घेऊ इच्छिणारे युवक, एमबीएचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि या विषयातील शिक्षण पूर्ण केलेले कार्यकर्ते यांच्या बरोबर स्वामी सुबोधानंद शाखेचे **श्री. हेरंब कुमठेकर** यांनी त्या क्षेत्रातील करियर आणि पुढील संधी यावर संवाद साधला. श्री. हेरंब कुमठेकर गेली दहा वर्षाहून अधिक साऊथ आफ्रिका खंडातील विविध देशात काम करत आहेत. ते मोटीसन ग्रुपमध्ये जनरल मॅनेजर पदावर कार्यरत आहेत.



## अभिनंदन

◆ केतन नव्हे **सहाय्यक प्राध्यापक केतन क्यादर.** गंज पेठेतील स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवक कार्यकर्ता केतन क्यादर दादा महाराष्ट्र राज्य प्रात्रता परीक्षा (MH-SET) गणित विषयात उत्तीर्ण झाला आहे. सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग येथे Assistant Professor of Mathematics म्हणून काम करत आहे. शिक्षण पूर्ण करताना दोन वर्षे शाखा प्रमुख, दोन वर्षे केंद्रीय तासिका व्यवस्थेत सक्रिय होता.

◆ पर्वती दर्शन येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अभ्यासिकेतील विद्यार्थी **अक्षय मजगुडे** (SRPF), **शशिकांत होटकर, छाया मौर्य** यांची मुंबई शहर पोलीस म्हणून निवड झाली.

◆ स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी **श्री. राहुल बैरागी,** जिल्हा प्रकल्प प्रमुख, पालघर 'सेट परीक्षेत' उत्तीर्ण झाले.



◆ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीचा सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वर्धिनीच्या सहकार्यवाह, महिला विभाग प्रमुख **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना **'कृतज्ञता' पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले.

◆ भारतीय स्त्री शक्ती जागरण तर्फे आयोजित राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत वर्धिनीच्या युवा गटाच्या 'Breaking Gender Stereo types' या विषयाला अनुसरून वैकुंठ स्मशानभूमीत महिलांनी केलेल्या कामावर आधारित **'प्रवाह'** लघुपटाला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक अभिनेत्री, दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांच्या द्वारे घोषित करण्यात आले. तसेच याच स्पर्धेत उत्तम संकलनाचे (Best Editor) पारितोषिक सौमित्र गुंडला याला मिळाले. हृषिकेश कायत, शेखर चव्हाण, ऋतुजा नराल, संदीप मोरे, सौमित्र गुंडला या युवकांचा लघुपटात सहभाग होता.



◆ कोविड काळात केलेल्या कामाबद्दल महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री. राजेश टोपे यांच्या हस्ते स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी, विशेष कार्य अधिकारी **श्री. कैलास अंडिल** यांना गौरवण्यात आले.

**सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !!**

## उत्थान विभाग



◆ मासिक प्रशिक्षण - या प्रशिक्षणात ऑनलाईन हजेरी कशी भरावी, मूल्यमापन चाचणीचा मुलांचा व प्रमुखांचा रिपोर्ट व त्यावर होणाऱ्या उपाययोजना याबद्दल अभ्यासिका प्रमुखांना माहिती दिली. संपर्क कसा करावा व अभ्यासिकेवर जाणवणाऱ्या मुलांच्या समस्या यावर प्रात्यक्षिक झाले.

◆ सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली. प्रियदर्शिनी अभ्यासिकेत श्रावणी गुळांबे या विद्यार्थिनीने

सावित्रीबाईंची वेशभूषा साकारून त्यांच्या ओव्यांचे सादरीकरण केले. तळई व रोहिदास अभ्यासिकेत चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

◆ मकरसंक्रांत – मकरसंक्रांतीनिमित्त सर्व अभ्यासिकेतील मुलांनी वस्तीमध्ये घरोघरी जाऊन तिळगूळ वाटले व शुभेच्छा दिल्या. संक्रांत साजरी का करतो, सूर्याचा असणारा संबंध याची माहिती मुलांना दिली. या सगळ्या सोबतच पतंग बनविण्याचा, उडवण्याचा आनंद मुलांनी घेतला.

◆ राजमाता जिजाऊ व विवेकानंद जयंतीनिमित्त राजमाता जिजाबाई यांनी केलेले कार्य, कोरोनामध्ये ऑनलाईन शिक्षण योग्य की अयोग्य, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा परिचय, कोरोना काळामध्ये बदलत चाललेली युवा पिढी या विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली.

◆ प्रजासत्ताक दिन – हरकादास अभ्यासिकेतील मुलांनी गांधीजींची वेशभूषा साकारली होती. उत्कर्षा अभ्यासिकेत भारताचा नकाशा समजावून सांगितला. राजमाता जिजाऊ अभ्यासिकेत चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. महाराणा प्रताप अभ्यासिकेत देशभक्तीपर नृत्याचे सादरीकरण केले. स्वराज्य अभ्यासिकेत भारताच्या राज्यघटनेची माहिती दिली. अशा विविध उपक्रमांनी प्रजासत्ताक दिन साजरा झाला.

◆ शिक्षणोत्सव – सर्वच अभ्यासिकांवर उत्तम प्रकारे सुरू आहे. या निमित्ताने वाचन, लेखन, म्हणी पाठ करणे, पाढे पाठ करणे, उलट अंक म्हणणे, आपल्या परिसरातील अडचणी शोधणे, विविध प्रश्न तयार करणे, संकल्पना समजून साहित्य तयार करणे, तक्ते तयार करणे असे उपक्रम चालू आहेत.



## समुपदेशन विभाग



**कार्यशाळा –**

◆ नवीन वर्षाच्या सुरुवातीला हुजूरपागा शाळेत दि. ३ ते ५ जानेवारी दरम्यान सौ. मेधाताई नगरे यांनी शाळेत 'पंचकोश' या विषयावर कार्यशाळा घेतली. नववीतल्या मुलींशी मोकळेपणाने संवाद साधून उमलत्या वयात पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळावी यासाठी सत्राच्या शेवटी ताईंनी झालेल्या मुद्द्यावर मुलींशी चर्चा केली व त्यांना पडणाऱ्या प्रश्नांना उत्तरे दिली. मुलींनीही मनमोकळेपणाने चर्चेत सहभाग घेतला.

◆ उत्थान विभागातील भाग प्रमुख व समन्वयक कार्यकर्त्यांसाठी दि. ७ जानेवारीला मैत्री, प्रेम, आकर्षण या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मैत्रीमध्ये नाते घट्ट असायला पाहिजे, ठरवून न करता येणारी एखादी गोष्ट आपल्याला आपल्या मैत्रिणीबरोबर करता आली पाहिजे. विश्वास, आपलेपणा, हे गुण मैत्रीमध्ये असले पाहिजे. मैत्री निरपेक्ष असावी, मैत्री कोणत्याही दोन व्यक्तींमध्ये होऊ शकते, त्यासाठी वय, पैसा, लिंग, जात, धर्म, देश याचा कुठलाही संबंध नसतो. मैत्री दोन व्यक्तींमध्ये नसून निसर्गावर, प्राणी-पक्षी यांसोबतसुद्धा करता येते. या मुद्द्यांवर चर्चा झाली.



**सुपर १६ बॅच –**

◆ दि. १० जानेवारीला श्री. शिरीष पटवर्धन यांनी सुपर १६ बॅचच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नियोजन अंगवळणी पडण्यासाठी नियोजनाची सवय लावली पाहिजे यासाठी हे सत्र घेण्यात आले. पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली – १) पाल्याचे दैनंदिन शैक्षणिक पातळीवर नियोजन २) स्पर्धेच्या युगात आपल्या शिक्षणाच्या निगडित करियरविषयी माहिती ३) आपल्या दिनचर्येमध्ये अभ्यासाबरोबर २४ तासाचे नियोजन ४) नवनवीन विषय, कला कुठल्या वेळेत शिकल्या पाहिजे ५) जे नियोजन आपण ठरवतो त्या निर्णयावर आपण ठाम असले पाहिजे ६) करियरविषयी ध्येय गाठायचे असेल तर त्याचे नियोजन आत्ताच केले पाहिजे व ते अंमलात आणले पाहिजे. ७) शारीरिक सुदृढतेसाठी आहाराचे व्यायामाचे महत्त्व ८) बौद्धिक विकास व्यक्तिमत्त्व विकास यासाठी कृतीशील उपक्रमांची जोड असावी. अवांतर वाचन, स्पोकन इंग्रजी, नवनवीन शैक्षणिक माहिती शोधणे इत्यादी. कुठलीच गोष्ट अशक्य नाही. नियोजन असेल तर कुठलीही गोष्ट साध्य करता येते. स्वतःमध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी प्रत्येक गोष्ट नियोजनपूर्वक करायला शिकले पाहिजे. सर्व विषयावर चर्चात्मक पद्धतीने मांडणी झाली. मुलांनीही मनमोकळेपणाने चर्चेत सहभाग घेतला व अभ्यासाविषयी आपल्याला पडणारे प्रश्न सरांशी मनमोकळेपणाने विचारले व सरांनी ही त्यांना उत्तरे दिली.

◆ दि. १७ जानेवारीला डॉ. विनेश नगरे यांनी

व्याख्यानातून आरोग्य, प्रसन्न मन, आत्मा आणि आपली इंद्रिये असे सूत्र सर्वांसमोर ठेवले. यासाठी काय काय करता येईल यावर सविस्तर मार्गदर्शन सरांनी केले. शारीरिक फिटनेस सोबत मेंदूचा फिटनेस, सामाजिक फिटनेस, नात्यातील फिटनेस कसा महत्त्वाचा आहे आणि तो कसा साधायचा यासाठी साध्या सोप्या पद्धती यातून सर्वांना सांगण्यात आल्या.

**पालकसभा -**

श्रीमती शिल्पाताई तांबे यांनी सुबोधानंद व राजर्षी शाहू शाखेतील पालकांना 'आनंदी पालकत्त्व' यावर मार्गदर्शन केले. ताईंनी सत्राला सुरुवात करण्याआधी पालकांना पाल्यांच्या जाणवलेल्या समस्यांविषयी विचारले. तेव्हा सतत मोबाईल मुले पाहतात, मुलं संवाद साधत नाही. शाळा नसल्यामुळे सोबत संगतीचा परिणाम इत्यादी गोष्टी लक्षात आल्या. त्यावर मार्गदर्शन करताना शिल्पाताई म्हणाल्या, ''मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असताना त्यात सगळ्यांचा सहभाग असतो. कुटुंबाचा, आजूबाजूच्या परिसराचा, मित्र-मैत्रिणींचा व शेवटी समाजाचा. मूल नीट अभ्यास करत नाही, नीट वागत नाही तर त्यांच्यावर या सगळ्यांचा परिणाम होत असतो. त्याला एकट्याला दोषी समजू नये. * वयाप्रमाणे मुलांमध्ये परिपक्वता येत असते. * मुलांचा सांभाळ करताना प्रेम आणि आदरभाव हा पालकांमध्ये असला पाहिजे. * मुलंही अनुकरणशील असतात म्हणून मुलांसमोर वागताना सतर्क असायला हवे. * संवादातून व्यक्त होणं, स्पर्शाचे महत्त्व, नात्यांमधला ओलावा यातून मुलांच्या भावना जपल्याच पाहिजे. * मुलांकडून अनाठायी अपेक्षा करू नये, त्याची बुद्धीक्षमता जेवढी आहे तिथपर्यंत तो पोहोचू शकतो. * जे नियम मुलांसाठी ठरवतो त्या नियमाचे पालन पालकांनीसुद्धा करायला हवे.''

**विविध चाचण्या -**

दि. ४ जानेवारीला शाखा विभाग समन्वयक यांची पर्सनालिटी टेस्ट व इंटरेस्ट इन्व्हेंटरी टेस्ट घेण्यात आली.

दि. १५ जानेवारीला नरवीर तानाजी मालुसरे व सुबोधानंद शाखेतील युवकांची पर्सनॅलिटी टेस्ट घेण्यात आली.

* * *

जानेवारी २०२२ ला विभागाला दोन वर्षे पूर्ण झाली. दि. २० जानेवारीला विभागाचे स्वतंत्र दालन 'स्वरूप मित्र समुपदेशन कक्षा'चे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन व सहकार्यवाह पुष्पाताई नडे यांच्या हस्ते झाले. विभागातील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शोभा वाढवली.

## ग्रंथालय



'वाचनाने जीवन समृद्ध होते' ही उक्ती सार्थ आहे. ग्रंथालय विभागाने दि. १८ जानेवारीपासून प्रत्येक मंगळवारी 'चला पुस्तके चाळूयात' हा उपक्रम दुपारी १२ ते २.३० या वेळेत वर्धिनीच्या ओंकार सभागृहात सुरू केला आहे. काही जुनी व नवीन निवडक पुस्तकांची मांडणी करून वाचनाची आवड वाढवावी या हेतूने हा उपक्रम चालू आहे. विशेष म्हणजे दररोज चालणाऱ्या साक्षरता वर्गातील महिला पण ही पुस्तके चाळताना, बघताना दिसतात.

## महिला विभाग

रथसप्तमीनिमित्त बालवाडी शिक्षिका व सर्व विभागातील महिला कार्यकर्त्यांनी गायत्री मंत्राची उपासना व १३ सूर्यनमस्कार घालून सूर्योपासना केली. तसेच माले वर्गातील विद्यार्थिनींनी सूर्योदयाच्या वेळी गायत्री मंत्राचे १०८ वेळा पठण केले.

## पाकोळी बालवाडी

अजूनही कोरोनाच्या निर्बंधांमुळे बालवाडी दूरदृश्य प्रणालीने सुरू आहे. प्रत्येक गुरुवार व शनिवार गुगल मीटद्वारे एक ते दीड तासाचा वर्ग होत आहे. यात अभ्यासक्रमानुसार पाठ होतात. संक्रांतीचा सण मुलांना भोगी व संक्रांतीची माहिती सांगून, तिळगुळाच्या लाडूचे प्रात्यक्षिक दाखवून ऑनलाईन पद्धतीने साजरा झाला. प्रजासत्ताक दिनानिमित्त मुलांनी तिरंगा रंगवून त्याला घरात सलामी दिली तर काही मुलांनी देशभक्तीची गाणी सादर करून त्याचे व्हिडियो गटावर पाठवले.

# 'आवाम' - कर्करोग तपासणी शिबिर

३१ जानेवारीला वर्धिनीमध्ये व्यावसायिक युवती गटाने स्तन व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची निदान तपासणी शिबिर आयोजित केले होते. ५७ महिलांनी याचा लाभ घेतला. पुण्यातील 'प्रयास' संस्थेचे सहकार्य शिबिरासाठी मिळाले. संस्थेच्या डॉक्टरांनी या तपासणीचे व वेळेत निदानाचे महत्त्व सर्वांना समजून सांगितले.

# आमचे युवा, आमची ताकद




**पायल जिरेसाळ,**
आपली बालवाडीपासूनची वर्धिका, वर्धिनीची कन्या. वर्धिनी मनामध्ये रुजणे किंवा वर्धिनीमय होणे काय असते हे छोट्याशा पण अभिमान वाटाव्या अशा कृतीतून तिने दाखवून दिले. दोन वर्षांपूर्वी तिला रेडिओलॉजी टेक्निशियनचा डिप्लोमा करण्यासाठी शुल्क भरायला वर्धिनीने मदत केली. तिने अतिशय मन लावून शिक्षण पूर्ण केले आणि तिला वेध लागले नोकरी मिळण्याचे. परंतु नेमका लॉकडाऊनचा काळ होता. त्यामुळे चार-पाच ठिकाणच्या मुलाखतीनंतर मिळालेली नोकरी मान्य केली. रोज एक तासाचा बसचा प्रवास; तसा पगारही बेताचा होता. परंतु सुरुवातीचा अनुभव खूपच महत्त्वाचा म्हणून मिळालेली नोकरी तिने मान्य केली. कामावर रुजू झाली. कामाचे तास जास्त होते तरीही ताई नोकरीवरून तडक शाखेत उपस्थित असायची. संपर्काला लगेच जायला तयार ! घरी जाऊन पालकांना किमान तोंड दाखवा, काहीतरी खाऊन मग शाखेत या असा प्रेमळपणे व रागावून दिलेला दम हसून कानाआड झाला. शाखेत मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सलग नवीन उपक्रम घेणे चालूच. घरची परिस्थिती बेताचीच. मिळालेल्या पगारातून घरच्यांसाठी प्रथम छोट्या छोट्या वस्तू तिने घेतल्या. (घरातली पहिली कमावती मुलगी ना !) परंतु अजूनही स्वतःसाठी काही घेतलेले नाही. बसच्या पासचे पैसे जाऊन जे शिल्लक राहिले ते वडिलांकडे जमा करत गेली आणि शेवटी ४ महिन्यांनंतर वर्धिनीत जमा करायची ३२०००/- रुपये रक्कम झाल्यावर तिच्या जीवात जीव आला. वाढदिवसाच्या आधी फीची रक्कम वर्धिनीत जमा करायचा तिचा निश्चय झाला आणि त्यात २००० रुपये अधिक देऊन तिने तो पूर्णही केला. अजून पुढे शिकायचे आहे तर त्यासाठी काही दिवस नोकरी करेन आणि फी साठवेन हाही तिचाच निश्चय. **स्वतः हवे तेवढे कष्ट करून आपण स्वतःला सिद्ध करायचे आणि सोबत इतरांनाही पुढे आणायचे हे मनात पक्के रुजले आहे.** तिची जिद्द खरंच कौतुकास्पद आहे. हे बघून आज ज्ञापुंची मान अभिमानाने ताठ झाली असणार.

# २६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन

वर्धिनीच्या इमारतीत सकाळी ८.३० वाजता प्रसिद्ध लेखिका मा. सौ. मृणालिनी चितळे यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. त्यांनी अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आपण प्रत्येकाने आपल्या देशाप्रती असलेला आदर आपल्या कृतीतून, कर्तव्यातून व्यक्त करण्याचे आवाहन केले. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, कविता सादर केल्या. ऋतुजा अभ्यासिकेत परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# श्रद्धांजली



◆ विज्ञान भारतीचे संस्थापक-सदस्य व वर्धिनीचे मार्गदर्शक **डॉ. वसंत अंबादास तथा दादा पुणतांबेकर** यांचे व त्यांच्या पत्नीचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

डॉ. दादा पुणतांबेकर - एक हरहुन्नरी प्राध्यापक

दादांचा आणि 'स्व'-रूपवर्धिनीचा स्नेह जुनाच ! तो अधिक दृढ झाला वर्धिनीच्या वास्तूत प्रयोगशाळा सुरू झाल्यावर. दादांना मुलांना शिकवायला आवडायचे. वर्धिनीचे विज्ञान शिबिर असो किंवा १० वी मार्गदर्शन वर्ग दादा आनंदाने सहभागी होत असत. महाविद्यालयात मोठ्या विद्यार्थ्यांना इंग्लीशमधून शिकवणाऱ्या प्राध्यापकाला लहान मुलांना मराठीतून विज्ञान शिकवणे आणि तेही मुलांना आवडेल असे हे कठीण होते. पण हे कठीण काम दादा अगदी सहज करीत असत.

वर्धिनीत जेव्हा प्रयोगांचे साहित्य आले तेव्हा दादांचा चेहरा उजळला. त्यावेळी दादा म्हणाले होते, ''आता विज्ञान शिकवताना खरी मजा येईल.'' दादा मग वेगवेगळे प्रयोग दाखवत भौतिकशास्त्रातील एकेक संकल्पना स्पष्ट करू लागले. मुलांना ती मेजवानीच होती. दादाही न थकता हा आनंद घेत होते.

प्रयोगशाळा स्थिरस्थावर झाली; अशातच १९९६ साल उजाडले. किशाभाऊ व दादांनी ठरवले की ह्या प्रयोगशाळेचा उपयोग पुण्याजवळील ग्रामीण भागातील मुलांनाही झाला पाहिजे. किशाभाऊंनी दादांना सांगितले, ''मी गाडी व ड्रायव्हरची व्यवस्था करतो, दादा तुम्ही शिक्षक तयार करा.'' दादांनी विज्ञान भारतीतील शिक्षकांना तयार केले. प्राज इंडस्ट्रीजने एक जीप व ड्रायव्हर दिला आणि दर शनिवारी ही विज्ञान भारती व 'स्व'-रूपवर्धिनीची फिरती प्रयोगशाळा मुळशीत जाऊ लागली. दर शनिवारी दादा सर्वप्रथम येऊन उपकरणे बरोबर घेतली आहेत ना; ह्याची खात्री करून घेत. वाटेत दादा त्या दिवशीच्या प्रयोगाबरोबरच मुलांचे कुतूहल जागवणारी कोणती माहिती सांगायची ह्याची चर्चा करीत असत. त्यामुळे आम्हा कार्यकर्त्यांची जडणघडण होत होती. पुढे मोठी गाडी मिळाल्यावर दादा आणि आम्ही आठवड्यातील पाच दिवस ग्रामीण भागात जाऊ लागलो. दादाही न थकता पाचही दिवस यायचे. त्यामुळे आम्हालाही वेगळी ऊर्जा मिळत असे. दादांनी ग्रामीण शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गही घेतले.

अमेरिकेतून येताना त्यांनी वर्धिनीतील मुलांना शिकवताना उपयुक्त ठरतील असे काही वैज्ञानिक खेळ व मॉडेल्स आणली होती. त्या खेळातील वैज्ञानिक संकल्पना समजावून सांगताना दादा अक्षरशः मुलांमधलेच एक होत असत. चेहऱ्यावर एक विलक्षण आनंद असायचा. न कळत आमच्यातील एक शिक्षक घडत होता. त्यामुळेच आज २५ वर्षे फिरती प्रयोगशाळा कार्यरत आहे. ह्याच्या श्रेयात दादांचा वाटा मोठा आहे. 'स्व'-रूपवर्धिनी परिवार दादांचा नेहमीच कृतज्ञ आहे. 'स्व'-रूपवर्धिनीवर नितांत प्रेम करणाऱ्या दादा व वहिनींना वर्धिनी परिवारातर्फे आदरांजली.

– सुनील कुलकर्णी

◆ पद्मश्री पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या **मा. सिंधुताई सपकाळ** यांचे निधन झाले. वर्धिनीच्या महिलांना, वर्धकांना, कार्यकर्त्यांना शिबिरात होणाऱ्या त्यांच्या व्याख्यानातून नेहमी मार्गदर्शन होत असे.

---

◆ सामाजिक कार्यकर्ते, लेखक, पत्रकार, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक, **डॉ. अनिल अवचट** यांचे निधन झाले. वर्धिनीच्या शिबिरातून वेगवेगळ्या विषयांवर त्यांचे मार्गदर्शन होत असे.

---

◆ पुणे शहर माध्यमिक शिक्षक संघटनेचे माजी उपाध्यक्ष व रमणबाग प्रशालेतील शिक्षक **श्री. शंकर दत्तात्रय दाबके** यांचे निधन झाले. वर्धिनीच्या प्रारंभी सरांचे इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन आजही स्मरणात आहे.

---

◆ भारतरत्न, स्वरसम्राज्ञी **लता मंगेशकर** यांचे निधन झाले. आनंदघन नावाने त्यांनी मराठी चित्रपटांना दिलेले संगीत व ७० वर्षे विविध ३६ भाषांमध्ये केलेले गायन सर्वांच्या हृदयात कायम राहील.

---

◆ प्रसिद्ध उद्योगपती बजाज ग्रुप उद्योग समूहाचे चेअरमन, पद्मभूषण **राहुलकुमार बजाज** यांचे निधन झाले. बजाज स्कूटरच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्यांच्या जीवनात मोठा बदल घडवून आणला.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**